शिवराम कृष्णा दळवी वि.

यशोदा न्हानू दळवी वगैरे

## निशाणी क्रमांक ११६ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.६ हीचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब माफ होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीच्या मते, सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र.६ ही दि.०३/०८/२०१९ रोजी मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र.६ ही मयत झालेबाबतची माहीती वादी यांना सप्टेंबर २०२३ मधील तिसऱ्या आठवडयात झाली. त्यानंतर त्यांनी मयत प्रतिवादी क्र.६ हीच्या मृत्यू प्रमाणपत्र व वारसांची माहिती मिळविली. वादी यांना मयत प्रतिवादी क्र.६ हीचे वारस अभिलेखावर दाखल करणेस ३ वर्षे १० महीना ४ दिवसांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे मयत प्रतिवादी क्र.६ हीचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी आपले म्हणणे दाखल करुन जास्तीत जास्त खर्च आकारण्याची विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने सरस निरस धडेवाटप होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी मयत प्रतिवादी क्र.६ हीचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे वादींचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.६ हीचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन माफ करणेत येतो.

३. खर्चाची रक्कम सरकार भरणा करावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2026.01.22 11:25:07 +0530

दिनांक- २०/०१/२०२६ (श्रीमती आर. जी. कुंभार)
ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.